म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८४४
१८०९
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं.

लक्ष्मण पांडुरंग भोसेकरकृत

मुरलीविलाप

REFBK-0000548
REFBK-0000548

किंमत दोन आणे

मुरलीविलाप

REFBK-0000548
REFBK-0000548

लक्ष्मण पांडुरंग भोसेकर

मातृस्तनींचा रस आननांत ! ।
जों होय वेणुध्वनि काननांत ॥
गळे ; गिळेना पय वासुरांतें ! ।
आश्चर्य वाटे गगनीं सुरांतें. ॥

—वेणुसुधा

विश्वात्मा प्रभु कृष्ण, गोकुल गमे माया जगन्मोहिनी ।
जें वृंदावन मुक्तिचें सदन तें, स्वानंद ज्याचा धनी ॥
भक्तप्रेमचि मुक्तिदायि मुरली, तो तद्रवें हाटकी ।
या या सोडुन गोकुला, सकलहो, गुंता न त्या नाटकीं ॥ १ ॥

—ल० पां० भो०

ठाणे

श्रीयुत नारायण वामन टिळक

यांस

त्यांची विद्वत्ता, कवित्व, सौजन्य, परहितेच्छा,
निरभिमानवृत्ति इत्याद्यनेक सद्गुण स्मरून
ही अल्पकृति कर्त्यानें फार प्रेमानें
व आदरानें अर्पण
केली असे

शिखरिणी

तरू लावी बागेमधिं चतुर माळी निजकरीं ।
तयांमध्यें कोठेंतरि बकुल तो स्थापित करी ॥
असें कोणा ठावें बसुनि तरु कोणान्तरिं असा ।
भरोनी टाकील मधुर निजगंधें दशदिशा ? ॥ १ ॥

—म० भा० विलास

५७१८

प्रस्तावना

एतावत्सरसिजकुड्मलस्य कृत्यं ।
भित्वांभः सरसि विनिर्गमो बहिर्यत् ॥
आमोदो विकसनमिंदिरानिवास- ।
स्तत्सर्वं दिनकरकृत्यमामनंति [१] ॥ १ ॥

मुरलीविलाप हें एक रूपक आहे. ह्या रूपकांतून कोणकोणते आणि कसले ध्वनि निघतात याचा निवाडा करून त्यांतले कोणते बरे आहेत, कोणते नाहींत हें ठरविण्याचें काम रसिकांचें आहे. मी इतकेंच ह्मणतों, कीं वर दिलेल्या श्लोकाप्रमाणें माझे ठिकाणीं जी कांहीं अल्पस्वल्प स्फूर्ति आहे तिनें, हें भीत भीत, अंतःकरणाच्या सरोवरांतून वर डोकें काढलें आहे. ही कृति काव्य नाहीं. ही ह्या स्फूर्तीच्या कृत्याची नुस्ती खूण आहे. वर येऊन रसिकांकडे सप्रेम पाहाणाऱ्या या बालकमलाचे रवि, वायु, भृंग सारे रसिकच आहेत! व या रसिक सज्जनांच्या संगतीच्या इच्छेनेंच मी हें वर डोकें काढीत आहें.

[१] कमळाच्या कळीचें इतकेंच काम आहे, कीं तिनें सरोवरांतून वर डोकें काढावें; त्यानंतर तिच्यांत सुवास उत्पन्न होणें, तिचा विकास होणें, तिच्यामध्यें लक्ष्मीनें (शोभेनें) निवास करणें, हें सर्व सूर्याचें काम आहे असें समजतात.

पद

(चाल—देइ आराम हा राम)

हा सत्संग बा सांग कार्यें नराचीं
साधी न ऐशीं जगीं कोणतीं ? ॥ १ ॥ ध्रु० ॥
हा बुद्धिमांद्याप्रती दूर सारी, ।
वाणीवरी हा सदा सत्य पेरी, ।
मानास देई सदा उन्नती; । हा सत्संग ।
सारी दुरी पाप । संमोह, संताप,
चित्तास आपाप । हर्षवी !
कीर्ती नराची करी सर्व लोकीं, ।
व्यापोनि तीनें दिशा सर्व टाकी ।
ही सज्जनाची गड्या संगती ! ॥ हा सत्संग ।

भर्तृहरीच्या वचनाच्या ह्या भाषांतराप्रमाणें मी हा **मुरलीविलाप** हें उपायन घेऊन सज्जनांकडे आलों आहें. ते माझ्या अल्प गुणाचा गौरव करितील, दोष असले तरी सांभाळून घेऊन ते दूर करितील, गुणांना वाढीस लावितील; ही रसिक जनाची सत्संगति काय करणार नाहीं ? सर्व कांहीं करील. हीच माझी दृढभावना मला पुरे आहे. हीच माझें कार्य करील असा मला भरवसा आहे.

या कृतीच्या समर्पणासंबंधानें दोन शब्द सांगणें इष्ट वाटतें. ज्या सद्गृहस्थांस ही अल्पकृति मीं अर्पण करण्याचें मनांत आणिलें त्यांची कीर्ति अर्वाचीन कवींपैकीं एक उत्तम कवि अशी दुमदुमून राहिली आहे व त्यांना अर्पण करण्याच्या योग्यतेची ही कृति मुळींच नाहीं हें उघड आहे. तथापि माझ्या आग्रहाचे विनंतीस त्यांनीं जो मान दिला तो केवळ मला उत्तेजन येऊन माझा विरस होऊं नये ह्मणूनच दिला व अशा थोरपणाचे कृतीनें मयूर कवीचे उक्तीप्रमाणें 'हळू हळु पढु स्वयें सुपार्थी लावियेलें' असें मला केलें या त्यांचे सौजन्याबद्दल त्यांचे कितीही आभार मानिले तरी पुरे होणार नाहींत हें निर्विवाद आहे. तथापि

शिष्टाचाराप्रमाणें मी फार आभारी आहें असें ह्मणून त्यांचे संबंधानें आणखी थोडेंसें सांगतों.

या सद्गृहस्थांचा पुराणांवर, कृष्णावर, किंवा कृष्णमुरलीवर धर्मसंबंधानें विश्वास नाहीं हें मशहूर आहे. तथापि ग्रीक पुराणांचा **रस्किन**सारख्या यूरोपीय पंडितांनीं किंवा **रेनल्ड**सारख्या चित्रकारांनीं जसा अर्थ करून आस्वाद घेतला, तसाच हे हिंदु पुराणांचा अर्थ करितात व आस्वाद घेतात. प्राचीन काव्यें, मग तीं कोठलीं कां असतना, त्यांत Myths ह्मणजे कल्पित परंतु लोकांनीं विश्वसनीय मानिलेल्या गोष्टी असावयाच्याच. त्याप्रमाणेंच बहुतेकांत उत्तानशृंगार, अतिशयोक्ति हेंही असावयाचेंच; पण ह्यांबरोबरच त्यांच्या अंतरंगीं केवळ काव्यरस ज्याला ह्मणतात त्याचाही अखंडप्रवाह सांपडावयाचाच असें यांचें मत आहे! तेव्हां धर्मबुद्धीचे संबंधानें जरी त्यांना पुराणें मान्य नाहींत तरी काव्यरसपूर्ण अशासंबंधानें त्यांना तीं मान्य आहेत व मींही ते मोठे कृष्णभक्त ह्मणून हा **मुरलीविलाप** त्यांना अर्पण केला नाहीं. परंतु ते काव्यरसाचा पूर्ण आस्वाद घेणारे व स्वतः उत्तम कवि ह्मणून अर्पण केला आहे. तेव्हां त्यांना हें काव्य अर्पण कां केलें व त्यांनीं याचा स्वीकार कां केला यांसंबंधानें कोणासही आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

आतां, एथल्याच काय पण विलायतेंतल्या सुद्धां तज्ज्ञांनीं ज्यांची प्रुफें तपासण्याबद्दल व पुस्तकाची नीट नेटकी जुळवाजुळव करून त्याला सुबकपणा आणण्याबद्दल तारीफ केली आहे, ज्यांच्या परिश्रमांमुळें **बापाचे अश्रु** ह्या छोटेखानी पुस्तकाचें स्वरूप इतकें रमणीय झालें आहे, त्या माझ्या मित्रांनीं—**रा० रा० भास्कर नानजी कोतक** यांनीं —ह्याही पुस्तकाची जुळवाजुळव करून ह्याचीं प्रुफें तपासलीं आहेत ह्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. तसेंच, हें काम सुबक करण्याबद्दल **निर्णयसागर** छापखान्याच्या चालकांचेही मी आभार मानितों.

शेवटीं, ज्यांनीं मला रसिकांपुढें येण्यास उत्तेजन दिलें त्या सर्व मित्रांचे उपकार मानून व ज्यानें आपल्या **मुरलीचा विलाप** गावयाची मला स्फूर्ति दिली त्या **श्रीमुरलीधराचें** चिंतन करून ही बरीच लांब झालेली प्रस्तावना पुरी करितों.

अकोलें,
जिल्हा अहंमदनगर,
२१ सेप्टेम्बर १९०९.

लक्ष्मण पांडुरंग भोसेकर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

मुरलीविलाप

दिंडी

काल रात्रीं मीं स्वप्न पाहियेलें ।
  सर्व कथितों जें स्मरणिं राहियेलें ॥
बरें वाइट जें स्वप्निं ये समोर ।
  नये ठेवूं तें गुप्त, म्हणति थोर ॥ १ ॥

पुढें माझ्या सुंदरी एक ठाके ।
  जिच्या रूपा पाहतां रती वांके ॥
मुखश्री ती परि दिसे तिची म्लान ।
  अधोवदना स्तब्ध ती शोकलीन ॥ २ ॥

बालयुवती[1] भासली ती शुभांगी ।
  दिसे तारुण्यच्छवि[2] न परी अंगीं ॥
सहज शंका मज येइ त्या प्रसंगीं ।
  जाळि चिंताज्वर हिला अंतरंगीं ॥ ३ ॥

[1] नुकतीच तारुण्यदशेंत आलेली. [2] तारुण्याची टवटवी.

चंद्र गेला अस्तास, लुप्त तारा, ।
रम्य सृष्टीचा म्लान हो[१] पसारा; ॥
सुंदरी ती भासली तेंवि खिन्न, ।
करी सुंदरताभंग मन विभिन्न[२] ॥ ४ ॥

कज्जलानें संदिग्ध[३] अश्रुबिंदू ।
गळति, त्यांहीं तो सांक[४] तन्मुखेंदू! ॥
चंद्र थोडा झांकिला मेघसंघें ।
दिसे तैसें तद्वदन शोकयोगें ॥ ५ ॥

दीनदृष्टी मजकडे मधुन पाही ।
हेतु दावी बोलणें असे कांहीं ॥
पुसावें मीं, तरि मशीं बोलण्याला ।
मला वाटे संकोच करिल बाला ॥ ६ ॥

बोलण्याला आरंभ कुणिं करावा ।
प्रश्न पडतो हा सदा स्त्रीस्वभावा ॥
दिसे व्रीडा[५] थांबवी तिची वाचा ।
परी जिज्ञासा[६] करी मला जाचा ॥ ७ ॥

सहज बोलूं जरि हिशीं उगिच कांहीं ।
हिला रुचतें, कीं न, हा नेम नाहीं ॥
अशी शंका वाटली प्रथम, मीं ती ॥
दूर केली; जगिं हीच पुरुषनीती ॥ ८ ॥

तिला वदलों, सति सांग तुझी वार्ता ।
शोकतापें तनुलता दिसे तप्ता ॥
परस्त्रीशिं न बोलणें परीपाठीं ।
शुद्धभावा परि नसे आडकाठी ॥ ९ ॥

[१] झाला. [२] भंगलेलें. [३] माखलेले. [४] कलंक (अंक) युक्त. [५] लज्जा.
[६] जाणण्याची इच्छा.

काय तुजला गांजण्या कुणि निघाला ।
सतीत्वावर घालण्या तुझ्या घाला? ।
त्यजी किंवा तव पती तुला दूर? ।
जेंवि टाकी जानकी रघूवीर ॥ १० ॥

मनोव्याधी तुज ताप देत आहे ।
वरी कैसी संकोचशाल[१] साहे ॥
शक्य संकट जरि तुझें वारण्याला ।
साह्य होइन, तूं न धरिं संशयाला ॥ ११ ॥

बोल माझे ऐकतां तिला भासे ॥
मिळे मायेचा स्वजन खरा ऐसें ॥
चित्त करुनी मोकळें तदा बाला ।
करूं पाही आरंभ बोलण्याला ॥ १२ ॥

तुफानाच्या मागून सिंधुतोय!
तशी शोकांतीं क्षण स्तब्ध होय ॥
पुसुन डोळे मग बोलण्यास लागे ।
शब्द येती ते खोल दुःखवेगें ॥ १३ ॥

ह्मणे हिंडुन पाहिले लोक नाना ।
वृत्त माझें ऐकण्या कुणि मिळेना! ॥
मुकलि पतिच्या जी प्रीतिदेणगीला ।
कोण पुसतो मज दीन अभागीला ॥ १४ ॥

द्वापरींची मी असें कृष्णमुरली ॥
कृष्णममता मजमाजि तदा मुरली ॥
पतित्यक्ता परि अतां मी अपेशी ।
रडत आलें हेतुनें तुम्हापाशीं ॥ १५ ॥

तुह्मी दिसलां सत्वस्थ, शांतवृत्ती ।
गोड ममतेच्या शब्दिं ये प्रतीती ।

[१] संकोचरूप शालजोडी.

ह्मणुनि आलें मज धैर्य बोलण्याला ॥
नाहिं मिळला कुणि असा ऐकण्याला ॥ १६ ॥

असें बोलुन निजवृत्त कथी सारें ।
हृदयगुप्ताला देइ बाह्य वारें ॥
तिचे शब्दचि सांगणें बरी गोष्ठी ।
घालुं मी तरि पदरचें कशासाठीं? ॥ १७ ॥

पद

(चाल—बाळा जो जो रे । कुळभुषणा इ०)

ऐका ऐका हो । मद्वचना । या मुरलीची दैना! । मद्दुर्दैवकथा ।
वदतांना । अश्रुपूर ये नयनां । ऐका ऐका हो ॥ ध्रु० ॥

माझा जन्म असे । सद्वंशीं[१] । पूर्वज माझे ऋषी[२] । सोसुन हिमतापा ।
वृष्टीशीं । सतत उभे तापसी[२] ॥ ऐका ऐका हो इ० ॥ १ ॥

त्यांही तप केलें । त्याच परी । तनु अर्पिलि असिधारीं[३] ।
नाहीं डगमगलें । तिळभरी । कापियलें[३] मज शिरीं ॥ ऐका ऐ०॥२॥

ऐसी आचरितां । तपराशी । रंध्रें पडलीं तनुशी ।
झालें पोकळ मी । स्वशरिरीं । न जिरे वायू वारी ॥ ऐका ऐ० ॥३॥

माझे मनिं हेतू । बहु थोर । विष्णू विश्वंभर ।
प्राणेश्वर माझा । पति व्हावा । अंकित नित्य रहावा ॥ ऐका ऐ० ॥ ४ ॥

कृतत्रेतयुगीं । बहु शिणलें ॥ नाहीं यश मज आलें ॥
त्रासुन मग देवा । आळविलें । फारचि निष्ठुर वदलें ॥ ऐ० ॥ ५ ॥

माझा मज वाटे । बहु खेद । केला त्यां उपमर्द ॥
कथितें मी जे त्या । करुणाब्दा । कठिण बोलल्या शब्दां ॥ ऐ० ॥ ६ ॥

[१] उत्तम वंशांत, पक्षीं उत्तम वेळूमध्यें. [२] वेळूंचा वनवास: एकेच ठिकाणीं नेहमीं उभें असणें, शीतोष्णसहन, वगैरे गोष्टींस अनुलक्षून ‘ ऋषी ’, ‘ तापसी ’ असें ह्मटलें आहे. [३] तरवारीच्या धारेवर (कळकापासून तुटलें जाणें, भोंकें पडणें वगैरेस अनुलक्षून हें अलंकारिक आहे).

पद

(घोर भयंकर निर्जन विपिनीं राम पुढें झाला)

पतितपावना नाम तुझें मज आणी तव द्वारीं ।
पतित मि, पावन झाल्याविण नच जाइन माघारीं ॥ ध्रु० ॥
धाव! पाव रे! ओरड माझी किति ऐकशि कानीं? ।
तुबगशि[1], वाटे काय तुला हा मधुर सूर गानीं ॥ पतित ॥ १ ॥
सोडुन तरि दे ब्रीद, फुकट कां पडशी अभिमानीं? ।
नाम पतितपावन हें तुजला ठेवियलें कोणीं? ॥ पतित ॥ २ ॥
घेशी तेव्हां देशी! असला असशि महोदार! ।
पुरें रोधिलें आज तुझें मीं कृपणाचें दार ॥ पतित ॥ ३ ॥
कांता लक्ष्मी तुझी तुझ्या जैं येइल भेटीला ॥
हसेल पाहुनि दार रोधिलें, त्यागिल कृपणाला ॥ पतित ॥ ४ ॥
भक्त तुझे तव येति दर्शना, सत्वशील मूर्ती ।
उलगडि माझा लढा, नातरी होइल दुष्कीर्ती ॥ पतित ॥ ५ ॥
उपाशिं बसलें दारिं तुझ्या मी न येशि बाहेरी ।
विश्वंभर[2] या नामें तुजला, कोणिं दिली थोरी ॥ पतित ॥ ६ ॥
कुडींत माझ्या प्राण तोंवरी न सोडिं मी दारा ।
अढळचि माझा निश्चय ठरला होइन तव दारा[3] ॥ पतित ॥ ७ ॥
भल्या गोष्टिनें कृपा करोनी मम इच्छित देईं ।
नातरि आतां पहा सोडितें प्राण तुझ्या पायीं! ॥ पतित ॥ ८ ॥

(पहिलें पद पुढें चालू)

निश्चय दृढ माझा देखोनी । द्रवला चक्रपाणी ।
झाला दृष्टांत । मज रात्रीं ॥ दिसला लक्ष्मीपती ॥ ऐ० ॥ ७ ॥
बोले मजला तो । द्वापारीं । होइन कृष्ण मुरारी ।
तव पाणिग्रहणा[4] । त्या काळीं । करिन, समय तो जवळी ॥ ऐ०८॥

[1] कंटाळत नाहींस. [2] सर्व विश्वास पोसणारा. [3] स्त्री, पत्नी. [4] हात धरणें, विवाह—लग्न करणें.

पुढतीं मी झालें । मधु मुरली । इच्छा सर्वहि पुरली ।
पहिला मान मला । चुंबना । हरि मज विसंबेना ॥ ऐ० ॥ ९ ॥

माझ्या शब्दबळें । दळ हाले । जणुं कीं कृष्णचि बोले ।
मजला कृष्ण धरी । निजहस्तीं । मजवर अनुपम[1] प्रीती ॥ ऐ० ॥१०॥

माझा रव कानीं । ऐकोनी । गोपी गोप मिळोनी ॥
गाई वासरें । गृह त्यजुनी । धावति वृंदावनीं ॥ ऐ० ॥ ११ ॥

ते दिन मज जेव्हां । आठवती । सर्वचि सुखसंगती ।
वाटे मज तेव्हां ॥ बहु थोडें । स्वर्गसौख्य त्यापुढें ॥ ऐ० ॥ १२ ॥

परि हा सुखसोहळा । मम भाळां ॥ लिहितां विधि जणुं थकला ।
म्हणुनिच दिन पुढतीं । सुखदायी । सरले माझे बाई ॥ ऐ० ॥१३॥

ऐका ऐका हो । मद्वचना ॥ या मुरलीची दैना! मद्दुर्दैवकथा ।
वदतांना । अश्रुपूर ये नयनां । ऐका ऐका हो ॥

दिंडी

वदुनि ऐसें जाहली स्तब्ध बाला ।
लोट अश्रूंचा नयनिं पुन्हा आला ॥
गळा आला दाटून दुःखभारें ।
शब्दमार्गा अडविलें शोकचोरें ॥ २० ॥
टाकुनीयां मग दीर्घ उसासा ती ।
म्हणे येथुन लागली साडेसाती ॥
उजेडाच्या मागून अंधकार ।
पडे श्यामा[2] दिवसान्ति जणूं घोर ॥ २१ ॥
सुखादुःखाची जोडि ही सदाची ॥
जुळीं भावंडें उभय जणूं साचीं ॥
एकमेकांच्या जवळ राहताती ।
वियोगातें जणुं फार भिती चित्तीं ॥ २२ ॥

[1]दुसरी उपमा नाहीं अशी, अलौकिक. [2]काळोखी रात्र.

५२८

सर्व दुःखांचा जणूं महाराणा ।
   होइ मत्सर सापत्न बायकांना ॥
जिच्या येतें नशिबांत सोसणें तो ।
   तिच्या दुःखाचा पूर्ण कळस होतो ॥ २३ ॥

हाच धाडी वनवासिं रामसीता ।
   दशरथाचाही हाच जीव घेता ॥
सप्तवर्षी ध्रुव बाळ सुकुमार ।
   विपिनवासीं कष्टला निराहार ॥ २४ ॥

गोष्ट माझी त्याहून फार भिन्न ।
   सपत्नी त्या विख्यात समसमान ॥
जिला माझ्या सरि नसे खेटराची !
   तिनें व्यावें घर! खंत मला ह्याची ॥ २५ ॥

वक्र वंशाची[१] एक युवति आली ।
   काष्ठकारापासून[२] जन्मलेली ॥
मूळ कुळपुरुषहि[३] एक तिचा माझा ! ।
   काय सांगूं मी भोग कपाळाचा ॥ २६ ॥

कशी चांडाळिण भेटली हरीला ।
   तिनें भुलवीला! मत्सखा हरीला[४]! ॥
नांव कावड काळुंद्रि किती वानूं ।
   जाइ तेथें लोपला दिसे भानू ॥ २७ ॥

काटकोळी, फेंगडी, लांबटांगी ।
   उंच ढांगळ, जणुं हडळ दिसे अंगीं ॥
वक्र कंबर जशि पालखिची दांडी ।
   शब्द कर्कश, चालतां[५] बोलभांडी[५] ॥ २८ ॥

[१]कडू जातीची, पक्षीं वाकड्या वेळूची (कावडीचे कळकास वाक असतो). [२]सुतारापासून (कावड बनविण्यास सुतार लागतो). [३]'कळक' हा. [४]हरण केला, नेला. [५]चालतांना कावडीचा कर्र कर्र असा आवाज होतो त्यास अनुलक्षून.

हिचें आलिंगन पळहि ज्यास होतें ।
त्यास वाटे जणुं फणसपाठ भेटे ॥
कुणीं वानावें रूप खापरीचें ।
तेंच कृष्णा, परि, भासलें परीचें[1] ॥ २९ ॥

कृष्ण खांद्यावर रोज तिला घेई ।
तिच्यासंगें अवनतीप्रती[2] जाई ॥
कुसंगानें पाणक्या हंत[3] होई !।
एकनाथाच्या घरीं सुखें राही ॥ ३० ॥

जणूं दुसरी नव्हतीच भक्तसेवा ।
अन्य गरजचि भक्तास त्या नसे वा ॥
नीच नारीसंगती ही असीच ।
मानकीर्तीखंडनीं जणुं असीच[4] ॥ ३१ ॥

खरें माझें दुर्दैव फळा आलें ।
कृष्णवर्तन ही पूर्ण कृष्ण[5] झालें ॥
कुरुप माझ्या कुळिंचीच, तिचे टेंभे ।
कृष्ण मिरवी तें मनीं मला झोंबे ॥ ३२ ॥

कृष्ण ! सांगूं मी अधिक तरी काई ।
जिती, मेलें, मी ! दाद तया नाहीं ॥
लाज सोडोनी स्कंधिं तिला घेई ।
प्रेम करितें पुरुषांस अंध बाई ! ॥ ३३ ॥

किती रडलें, बोललें किती त्याला ।
कांहिं त्याचा उपयोग नाहिं झाला ॥
फुलें वेंचिलिं मीं जिथें, हाय ! हाय ! ।
तिथें आतां गोंवऱ्या वेंचुं काय ! ॥ ३४ ॥

कृष्ण किंवा तव जीव देइं मातें ॥
काळ वदता तरि अर्पितें जिवातें ॥

[1] अप्सरा, देवांगना. [2] कमीपणा, हलकेपणा. [3] हाय ! हाय ! अरेरे !
[4] तरवारच. [5] काळें, वाईट.

तोच[1] शेखीं[2] भेटला मला भाऊ ।
  किती त्याचे उपकार मुखें गाऊं ॥ ३५ ॥

पुन्हा मजला कलियुगीं जन्म होई ।
  ह्मणति अल्गुज मज तदा सर्व ठायीं ॥
मिळे मजला लोकांत फार मान ।
  तयां रंजविं मी करुन मधुर गान ॥ ३६ ॥

तिथें जडली परि कुसंगती मातें ।
  सदा जाईं नाटका तमाशातें ॥
त्यांत वाटे मज तदा महानंद ।
  सर्व जडले मज तिथें छंदफंद ॥ ३७ ॥

खेद झाला मागून मला पूर्ण ।
  दैविं लिहिलेलें टाळि कसें कोण? ॥
पुन्हा गेलें मी शरण कृष्णनाथा ।
  शुद्धभावें ठेविला पदीं माथा ॥ ३८ ॥

कळे कावड ती सवत नव्हति कोणी ।
  तिला मानी कन्यका चक्रपाणी ॥
तपश्चर्या, मागणें तिचें जैसें ।
  करी भक्तांचा नाथ पुरे तैसें ॥ ३९ ॥

असो कैशी, परि कन्यकेसमान ।
  तिला स्कंधीं घेऊन करी मान ॥
अर्थ त्याचा भलताच करुनि बाई! ।
  व्यर्थ हरिला दूषिलें! सांगु काई ॥ ४० ॥

खरें सारें कळतांच तत्व मातें ।
  माझि मजलाची लाज फार वाटे ॥
हृदयिं टोंचे अनुतापदुःख भाला ।
  क्षमासिंधू तो[3], नमुनि, आळवीला ॥ ४१ ॥

[1] तो काळ. [2] शेवटीं. [3] तो कृष्ण.

ग्रंथ संग्रहालय ... ग्रं. क्र. ... ता.

भ्रष्ट पापिण मी सर्वदोषखाणी ।
शरण तुजला प्रार्थितें दीनवाणी ॥
गर्व, आग्रह, मम सर्व लया गेलें ।
हृदय माझें अनुतप्त[१] पूर्ण झालें ॥ ४२ ॥

सर्व माझे अपराध पोटिं घालीं ।
नाहिं तुजविण मज अन्य जगीं वाली
असें भावें प्रार्थितां कृष्णपायां ।
दिली त्यानें ही मला दिव्य काया ॥ ४३ ॥

ह्मणे, धरिला त्वां मनीं विषयहेत ।
तुझा तेणें जाहला अधःपात ॥
काम्य कर्मांची गती हीच पाहीं ।
फळें भोगुन मागुता जन्म येई ॥ ४४ ॥

करिशि तूं जरि निष्काम भक्ति आतां ।
फळें अर्पुन सर्वही जगन्नाथा ॥
फलेच्छेला जरि देशि मनिं न थारा ।
जन्ममृत्यूच्या चुकति येरझारा ॥ ४५ ॥

रूप सुंदर गर्वास मायबाप ।
नको ओझें, उपजवी मोह, पाप ॥
रम्य तनु ही जाईल पालटून ।
उद्यां धमनी[२] होशील रूपहीन ॥ ४६ ॥

जन्म परि हें उपकारकारि आहे ।
नको वायां घालवूं सांगतों हें ॥
सदा इतरांची क्षुधा शांतवाया ।
साह्य होई झिजवून आत्मकाया ॥ ४७ ॥

देह जाइल अग्नींत तरी जावो ।
परी परहित हें साध्य तुला होवो ॥

[१] पश्चात्तापानें युक्त–भरलेलें. [२] फुंकणी.

तपें सारीं परहितापुढें दीन ।
कुठें ओढे ते, कुठें हा नदीन[1] ॥ ४८ ॥

असें बोलुन ती मूर्ति गुप्त झाली ।
माझि गर्वाची ज्योति ही विझाली ॥
पुरे झाला, वाटलें, स्वार्थ, काम ।
अतां यत्नें साधणें मुक्तिधाम[2] ॥ ४९ ॥

परी येई मन्मनीं थोर चिंता ।
कुठें जावें मीं जगामधें आतां ॥
कोण मिळतो जो धरुनि मला हातीं ।
न करि माझा व्रतभंग तपोवृत्तीं[3] ॥ ५० ॥

इथें तेथें निरखून पाहियेलें ।
तुझा देखुन निश्चिंत[4] मनीं झालें ॥
उद्यां होतां मी धमनि[5], मनीं हेत ।
सुखें तुमच्या राहीन मी गृहांत ॥ ५१ ॥

शब्द निघतां हे तिच्या मुखावाटे ।
मना माझ्या आश्चर्य खेद वाटे ॥
काय सांगावें हिला नको, होय ।
हिची अपणाला असे गरज काय? ॥ ५२ ॥

जरी होइल घरिं हिची हेळसांड ।
तपाचरणीं होईल हिच्या खंड ॥
करुनि ऐसा पोक्तसा मी विचार ।
गोड शब्दीं तिस बोललों नकार ॥ ५३ ॥

बाइ, आहें गे विधुर एकला मी ।
तुला रक्षाया नसे कुणी धामीं[6] ॥

[1] समुद्र. [2] मुक्तीचें घर. [3] तपाचे वर्तनांत. [4] चिंतारहित, निष्काळजी.
[5] फुंकणी. [6] घरांत.

पाककर्ता मम एक असे गेहीं ।
तया धमनीची मुळीं गरज नाहीं ॥ ५४ ॥
इंधनीं तो भरपूर तेल ओती ! ॥
वरी लावोनी ज्वलनशलाका[१] ती ॥
जाळ करितो ! जाळील तुला व्यर्थ ।
अर्थ दोन्ही[२] राहोत; हा अनर्थ ! ॥ ५५ ॥
जाइं असतिल सुखिया ज्या गृहांत ।
मायसम तुज पाळील कुणी त्यांत ॥
मातृममतेची पाहिं नीट खूण ।
प्रेम मातेचें वर्णु शके कोण ? ॥ ५६ ॥
सृष्टि रचितां मातेस विधात्यानें[३] ।
दोन वस्तू अनुपम्य[४] दिल्या त्यानें ॥
स्तनीं बाळास्तव दुग्ध देइ तीच्या ।
मनीं घाली प्रेमाब्धि[५] त्या सतीच्या ॥ ५७ ॥
जाइ पहिलें वा राहि, कारणानें ।
दुजें हृदयीं आजन्म देइ ठाणें ॥
दुज्यानें ती होतसे धन्य आई ।
शक्य होणें नच तिचें ऊतराई ॥ ५८ ॥
एकखांबी घर असे बाइ, माझें ।
एक चक्रीं गाडिचें सर्व ओझें ॥
दुज्या बाजुस आधार जिचा होई ।
अशी माता मम गृहीं तुला नाहीं ॥ ५९ ॥
मुलेंबाळें खेळती, भांडताती ।
हट्ट करिती कितितरी त्रास देती ॥
तरी सर्वां जी सदा क्षमादायी ।
अशी माता मम गृहीं तुला नाहीं ॥ ६० ॥

[१] आगकाडी. [२] स्वार्थ व परमार्थ असे दोन्ही. [३] ब्रह्मदेवानें. [४] अलौकिक, निरुपम. [५] प्रेमसमुद्र.

मुली मुलगे जन्मती वाढताती ।
धनें ज्ञानें युक्त वा मूढ होती ॥
एकरूपचि परि जिचें प्रेम राही ।
अशी माता मम गृहीं तुला नाहीं ॥ ६१ ॥

देशकाल स्थिति सरळ विषम येवो ।
स्नेह सोडि न हृदयिंचा जिच्या ठावो ॥
जिला न शिवे मानापमान कांहीं ।
अशी माता मम गृहीं तुला नाहीं ॥ ६२ ॥

अतिथि, बांधव, वा कोणि इष्टमित्र ।
गृहा येतां मृदु वचनिं आदरीत ॥
अन्नदानीं उत्साह मनीं देहीं ।
अशी माता मम गृहीं तुला नाहीं ॥ ६३ ॥

यथाशक्ती सामुग्रि जशी साध्य ।
तशी घेउन रुचियोग्य करी खाद्य ॥
गृहन्यूनहि झांकून जिनें जाई ।
अशी माता मम गृहीं तुला नाहीं ॥ ६४ ॥

गृहीं होतां आजार कुणा कांहीं ।
करी शुश्रूषा राबुनी स्वदेहीं ॥
अन्यदुःखें[१] तडफडे जशी लाही ।
अशी माता मम गृहीं तुला नाहीं ॥ ६५ ॥

प्रसंगें जी करि दंड, भरे रागें ।
बाळ बिलगे तिजलाचि परी वेगें ॥
दुजें अभयस्थल तया, मनिं न येई ।
अशी माता मम गृहीं तुला नाहीं ॥ ६६ ॥

[१] दुसऱ्याचे दुःखानें.

बालकायुष्क्रम[1] गमे महागार[2] ।
पिता, त्याचा नेमिला शिल्पगार[3] ॥
मूळ पाया परि जिच्या करें होई ।
अशी माता मम गृहीं तुला नाहीं ॥ ६७ ॥

गोष्ट हितकर सांगतों तुला आतां ॥
जाइं जेथें भेटेल अशी माता ॥
नको भलतेसे करूं अतां चाळे ।
देव पुरवो तव हेतु, येइं बाळे ॥ ६८ ॥

नमस्कारुनि तीं मला म्हणे, ताता, ।
बोध केला तो रुचे फार चित्ता ॥
सत्य, ममतेनें स्फुरित[4] बोधवाणी ।
जगीं दुर्लभ जी, कोण ती अमानी ॥ ६९ ॥

अतां येतें मी लोभ असों द्यावा ।
तुह्मी मजला माहेरचा विसावा ॥
देव तुमचें कल्याण करो! येतें ।
तोचि दाविल मज वाट तशी जातें ॥ ७० ॥

बघुनि इतुकें जाहलों मीहि जागा ।
स्वप्नसृष्टी मावळे त्याच जागां ॥
काव्यवनिंचा जो गलित झाडपाला ।
गाइं तो मी या मुरलिविलापाला ॥ ७१ ॥

[1] मुलाच्या आयुष्याचा पुढील क्रम–वर्तन. [2] मोठें घर, थोर वाडा.
[3] रचणारा, कारागीर. [4] प्रेरित.

शिखरिणी

न जाणें साहित्या, सरस सरला शब्दरचना ।
परी भावें यत्न करित रिझवाया बुधजनां ॥
घडे कांहीं दोषास्पद तरि असें सज्ज नमना ।
क्षमा कीजे, साजे क्षम, सहनता सज्जनमना ॥ ७२ ॥

REFBK-0000548

PRINTED BY B. R. GHANEKAR FOR THE
PUBLISHER AT THE NIRNAYA-SAGAR
PRESS, BOMBAY

हीं पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील:

लक्ष्मण पांडुरंग भोसेकर,

संगमनेर (अहंमदनगर).